# ओझरखेड धरण, ता. दिंडोरी, जि. नाशिक




- उर्ध्व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत असलेले ओझरखेड धरण ता. दिंडोरी जि. नाशिक हे मातीचे धरण १९८४ मध्ये पूर्ण झाले आहे.
- नाशिक- वणी राज्यमहामार्ग क्र. १७ लगत सदरचे धरण असल्याने प्रवाशांना धरण जलाशयाचे व सुर्यास्ताचे विहंगम दृश्य अनुभवयास मिळते.
- ओझरखेड धरण हे नाशिक शहरापासुन ४० कि. मी. अंतरावर असून धरणस्थळापासून सप्तश्रृंगीगड (वणी) हे प्रसिद्ध धार्मिक स्थळ ३० कि. मी. अंतरावर आहे,
- ओझरखेड धरणपासून गुजरात राज्यातील सापुतारा हे प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण ५५ कि. मी. अंतरावर आहे. गुजराथ राज्यातून नाशिक, शिर्डी व त्र्यंबकेश्वर या धार्मिक स्थळांना भेटी देणारे पर्यटक ओझरखेड धरणस्थळी आवर्जुन थांबतात.
- ओझरखेड धरण स्थळ हे पर्यटनाचे केंद्र म्हणून शिर्डी, त्र्यंबकेश्वर, पंचवटी, नाशिक व सप्तश्रृंगीगड वणी येथे जाणारे भाविक तसेच उन्हाळा व नाताळ सुट्टीमध्ये लहान मुलांसह सहकुटुंब येणारे पर्यटक निसर्गाचा वारसा व विहंगम परिसर या गोष्टीमुळे आकर्षित होतात...!